## परिशिष्ट - ७ ब

## जिल्हाधिकारी यांजकडुन

## परळी वै. नगर परिषद, जिल्हा बीड

क्र. २०१६/जि.बी./डेस्क-१/एमयुएन/००९ दिनांकः ११.०८.२०१६

मा.राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील पत्र क्रमांक रानिआ/न.प. २०१६/प्र.क्र.१०/का-६ दिनांक १५ जुन २०१६ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ (१९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४०) चे कलम १०(१) खाली बीड जिल्हयाचा जिल्हाधिकारी निम्नोक्त आदेशाच्या अनुसूचिमध्ये दर्शविलेल्या प्रमाणे **परळी वै. नगर परिषद** क्षेत्र जितक्या प्रभागामध्ये विभागण्यात येईल त्या प्रभागांची संख्या व त्यांची व्याप्ती निश्चीत करण्याचे आणि ज्या प्रभागामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरीकांचा मागास वर्ग प्रवर्गासाठी जागा राखून ठेवण्यात येतील ते प्रभाग आणि त्याच प्रमाणे स्त्रीयांसाठी (अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती, नागरीकांचा मागास वर्ग प्रवर्गातील स्त्रीयांसाठी) जागा राखुन ठेवण्यात येतील ते प्रभाग दर्शविणारा क्रमांक २०१६/जी.बी./डेस्क-१/एमयुएन/**००३** दि. ०५.०७.२०१६ च्या आदेशाचा प्रारुप मसुदा महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४०) च्या कलम १० (१) च्या परंतुकामध्ये निश्चित केलेल्या पध्दतीप्रमाो उक्त नगर परिषद क्षेत्रातील रहिवाशांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यांत आला होता. त्यास अनुसरुन आलेल्या हरकतींचा सर्वकष विचार करुन त्यास अनुसरुन प्राप्त झालेल्या हरकतीवर सुनावणी घेऊन मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना अभिप्राय सादर करुन मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी पत्र क्र. २०१६ न.पा.प्र. निवडणूक कावी / **१३८** दि. २९.०७.२०१६ अन्वये मान्यता दिल्यानुसार मी,नवल किशोर राम बीड जिल्हयाचा जिल्हाधिकारी उक्त अधिनियमाच्या कलम १० पोटकलम (१) अन्वये प्रदान कलेल्या अधिकाराचा वापर करुन निम्नोक्त आदेश देत आहे.

### आदेश

ज्याअर्थी, महाराष्ट्र नगर परिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४०) च्या कलम ९ पोटकलम (२) अन्वये मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी त्यांचे आदेश क्र. २०१६/न.प.प्र./आस्था-२/कावि दि. १४.०५.२०१६ अन्वये त्यांनी **परळी वै.**नगर परिषदेच्या बाबतीत खाली दर्शविल्या प्रमाणे निवडावयाच्या सभासदांची संख्या अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती व नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग यांच्यासाठी राखुन ठेवावयाच्या जागा व स्त्रीयांसाठी (अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती व नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्गातील स्त्रीयांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन) निश्चित केलेल्या आहेत.

(१) निवडावयाची सभासदांची संख्या :- ३३

(२) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग यासाठी राखून ठेवावयाच्या जागांची संख्या

- (अ) अनुसूचित जाती :- ०५
- (ब) अनुसूचित जमाती :- ०१
- (क) नागरीकांचा मागास वर्ग प्रवर्ग :- ०९

(३) महिलांसाठी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्गाच्या महिलांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन) :- १७

(४) उपरोक्त क्रमांक ३ पैकी वरील क्रमांक २ (अ), (ब) व (क) येथील जागांमध्ये अनुसूचित जाती अनुसूचित जमाती व नागरीकांचा मागास वर्ग प्रवर्गाच्या महिलांसाठी राखुन ठेवावयाच्या जागांची संख्या खालील प्रमाणे राहिल

- (अ) अनुसूचित जाती :- ०३
- (ब) अनुसूचित जमाती :- ०१
- (क) नागरीकांचा मागास वर्ग प्रवर्ग :- ०५

(५) महिलांसाठी सर्वसाधारण जागा म्हणून राखून ठेवावयाच्या जागांची संख्या :- ०८
(अनुक्रमांक ३ समोरील नमुद केलेल्या जागा वजा अनुक्रमांक ४ अ, ब, व क समोरील नमुद केलेल्या जागा)

(६) सर्वसाधारण (अनारक्षीत) जागांची संख्या :- १०
(अनुक्रमांक १ समोर नमुद केलेल्या जागा वजा अनुक्रमांक २ अ, २ ब, २ क व अनुक्रमांक ५ समोरील नमुद केलेल्या जागा)

२. त्या अर्थी, आता मा.अवर सचिव राज्य निवडणुक आयोग, महाराष्ट्र यांचे पत्र क्र. रानिआ/नपा-२०१६/प्रक्र.१०/का-६ दि. १५ जुन २०१६ नुसार व महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १०, पोटकलम (१) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, नवल किशोर राम, जिल्हाधिकारी, बीड याद्वारे **परळी वै. नगर परिषद** क्षेत्र जितक्या भागात विभागण्यात येईल त्या प्रभागांची संख्या व त्यांची व्याप्ती व जनगणना २०११ नुसार प्रत्येक प्रभागाची लोकसंख्या आणि त्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची लोकसंख्या या आदेशाच्या अनुसूचि मध्ये दर्शविल्या प्रमाणे निश्चित करीत असुन ज्या प्रभागामध्ये यथास्थिती (अनुसूचित जाती, अनुसुचित जमाती आणि नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग यांच्यासाठी व महिलांसह) जागा राखुन ठेवण्यात येतील हे प्रभाग निर्दिष्ट करीत आहे.

(७) या आदेशाच्या तारखेच्या निकट नंतरच्या पुढील सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रयोजनार्थ हा आदेश अंमलात येईल.

स्थळ :- बीड
दि. ११/०८/२०१६

(नवल किशोर राम)
जिल्हाधिकारी, बीड

अनुसूची

परळी वैजनाथ नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०१६

| प्रभाग क्रमांक | प्रभागाचे नांव असल्यास | प्रभागाची एकुण लोकसंख्या, अनुसूचित जातीची लोकसंख्या, अनुसूचित जमातीची लोकसंख्या | जागा क्रमांक | प्रभागाची व्याप्ती (उत्तर, पुर्व, दक्षिण, पश्चिम) | आरक्षणाची स्थिती किती जागा कोणत्या प्रवर्गासाठी जसे अनु.जाती/अनु.जमाती /नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व स्त्रियांसाठी (अनु.जाती/अनु.जमाती/नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील स्त्रियांसाठी धरुन) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ४ | ६ |
| १ | टि.पी.एस. कॉलनी मिलिंद नगर | एकूण - ६२२६<br>अ.जा. - १५४०<br>अ.ज.-१७६ | १-अ<br>१-ब | पुर्व - गिरजाबाई साळवे यांचे घर ते रेल्वेपटरी ओलांडून पुर्वेकडे न.प. हद्दी पर्यंत<br>पश्चिम - गौतम नगर समाज मंदिर जवळील रेल्वे कुंपन भिंत ते गंगाखेड रोड ने न.प. हद्दी पर्यंत<br>दक्षिण - गौतम नगर समाज मंदिर जवळील रेल्वे कुंपन ते रेल्वे ब्रीज ते मुमताज भाई ड्रायव्हर यांच्या घरापासून गिरजाबाइ साळवे यांच्या घरा पर्यंत<br>उत्तर - गंगाखेड रोड न.प. हद्दीने एमएसईबी कंपाऊंड भिंतीने पुर्वेकडे न.प. हद्दीपर्यंत. | १अ- अनुसुचित जातीसाठी<br>१ब- सर्वसाधारण महिला |
| २ | बरकत नगर शिवनगर परिसर | एकूण - ६०५४<br>अ.जा. - ३३३<br>अ.ज.-१ | २-अ<br>२-ब | पुर्व - नगर परिषद हद्द सिमेंट फॅक्ट्री ने नगर परिषद हद्दीने वेताळ चौक (सिध्देश्वर नगर)<br>पश्चिम - अबुबकर मस्जीद ते जमिल व शब्बीर यांच्या घरापासून रेल्वे ट्रॅक न. प. हद्दी पर्यंत (सिमेंट फॅक्ट्री)<br>दक्षिण - वेताळ चौक ते सय्यद सलीम व आयुब मिस्त्री च्या कोपऱ्या पर्यंत न.प. पोल न. ११३ समोरील रस्त्याने उजव्या बाजूने नाल्यापर्यंत (नानवटे यांच्या घरापर्यंत) अबुबकर मस्जीद<br>उत्तर - पुर्वे कडे सिमेंट फॅक्ट्री न प हद्दी पर्यंत | २अ- नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिलांसाठी<br>२ब- सर्वसाधारण |

| प्रभाग क्रमांक | प्रभागाचे नांव असल्यास | प्रभागाची एकुण लोकसंख्या, अनुसूचित जातीची लोकसंख्या, अनुसूचित जमातीची लोकसंख्या | जागा क्रमांक | प्रभागाची व्याप्ती (उत्तर, पुर्व, दक्षिण, पश्चिम) | आरक्षणाची स्थिती किती जागा कोणत्या प्रवर्गासाठी जसे अनु.जाती/अनु.जमाती /नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व स्त्रियांसाठी (अनु.जाती/अनु.जमाती/नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील स्त्रियांसाठी धरुन) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ४ | ६ |
| ३ | उखळवेस परिसर | एकूण - ५११२<br>अ.जा. - १९१०<br>अ.ज.-१ | ३-अ<br>३-ब | पुर्व - घनसी नदी ने (बाळासाहेब देशमुख यांचया शेताजवळील) पुला पर्यंत<br>पश्चिम - लखन ठाकूर यांच्या घरापासून सावतामाळी मंदिर समोरील लोखंडे यांच्या घरापासून डाके यांचा खुला प्लॉट ते उखळवेस रस्ता ओलांडून उत्तरेकडे वेताळ चौक न.प. हद्द (शिवा लोखंडे यांचे घर)<br>दक्षिण - (बाळासाहेब देशमुख यांच्या शेताजवळील पुलापासून) पुलापासून कालरात्री मंदिर समोरील खुल्या जागेपासून महादू जोगदंड ते खंडोबा मंदिर होळकर चौक ते गेंदू सेठ दरक यांचे घर ते लखन ठाकूर यांच्या घरापर्यंत<br>उत्तर - शिवा लोखंडे ते न.प हद्दीने पुर्वेकडे न.प. ने पुर्वेकडे घनसी नदी कडे | ३अ- अनुसुचित जाती महिलांसाठी<br>३ब- सर्वसाधारण |
| ४ | गणेशपार काळरात्री मंदिर परिसर | एकूण - ५२८०<br>अ.जा. - ६१९<br>अ.ज.- ६ | ४-अ<br>४-ब | पुर्व - बाळासाहेब देशमुख यांच्या शेताजवळील (पुला पासून) न.प. हद्दी पर्यंत (नदी पर्यंत)<br>पश्चिम - अवस्थी यांचे घर ते शिंदे यांचे दुकान केंद्र (गोपाळकृष्ण टॉकिज जवळ)<br>दक्षिण - न.प. हद्दीपासून सर्व्हे नं. ३११ मधून भुतावले यांच्या घरापासून आदोड यांच्या घरापर्यंत तसेच बालासाहेब जगतकर यांच्या घरापर्यंत तसेच जाकिर हुसेन शाळा ते मिल्लीया शाळा बंगला गल्ली ते चौंडे यांचे घर, मानवतकर यांचे घर केंद्रीय शाळा ते वैदयनाथ विद्यालय कॉर्नर ते काळाराम मंदिर ते अवस्थी यांचे घर<br>उत्तर - शिंदे यांचे दुकान केंद्र उजव्या बाजूने गणेश पार, गणेश मंदिर ते भक्ताश्रम पुढे बाबा देशमुख यांच्या घरापासून दयानंद पाचांगे यांच्या घरा पासून (बाळासाहेब देशमुख यांच्या शेताजवळील) पुला पर्यंत | ४अ- नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला<br>४ब- सर्वसाधारण |